**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७३/२०११-१२ दिनांक :

श्री. रावसो पांडुरंग भोसले,
मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली

— विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. जी. सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रावसो पांडुरंग भोसले, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी आपल्या शेतामध्ये शेती वापरासाठी मीटर वाचना प्रमाणे बील मिळावे म्हणून अर्ज केला होता. त्यानुसार कंपनीने दि. २०.१२.२००८ रोजी मीटर बसविला आहे. मीटर प्रमाणे बील मिळावे व मीटर बसवूनही मीटर वापराप्रमाणे बील न मिळाल्याने भरपाई मिळावी अशी तक्रार मंचामध्ये यापूर्वी दि. ८.१२.२०११ रोजी केलेली होती.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

सदर तक्रारीचा न्याय निर्णय होऊन दि. २५.१.२०१२ रोजी मंचाने मीटर वापराप्रमाणे बीले द्यावीत व विलंबापोटी भरपाई मंजूर करण्यात येत आहे अशा आशयाचा आदेश मंजूर केलेला आहे. त्यास गृहीत धरुन ग्राहकाने तक्रार दाखल केली आहे. सदरची तक्रार प्रथमत: अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे दाखल होऊन त्याचा निर्णय दि. ५.११.२०११ रोजी झालेला आहे, मात्र विलंबापोटी भरपाई मिळालेली नाही, इतकीच तक्रार ग्राहकाची आहे.

आपल्या सविस्तर तक्रारीमध्ये विनियमातील तरतुदीनुसार भरपाई मिळावी, सदर भरपाई रकमेतून वि.प.ने मिटरवर आधारित दिलेले बील रु. ३२२०/- जमा करुन उर्वरित रक्कम रोख देण्यात यावी अशी मागणी ग्राहकाने आपल्या तक्रारीत नोंदविलेली आहे.

वि.प.ने मंचाच्या दि. २५.१.२०१२ च्या आदेशाप्रमाणे बील दुरुस्त करुन दिले आहे. त्याप्रमाणे ग्राहकास बील दिलेले आहे असे पत्र क्र. ३१८० दि. १२.६.२०१२ नुसार कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी कळविले आहे. तसेच मंचाने अधिक माहिती विचारली असतां, कांही कागदपत्रे हजर केली आहेत.

मंचाने तक्रार दाखल करुन घेऊन सुनावणी घेतली. तथापि, सुनावणी दिवशी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर उपस्थित राहण्यास असमर्थता दर्शविली व नंतरच्या वेळेस हजर राहून आपले म्हणणे दाखल केले. तथापि कागदपत्रे व त्याची पूर्तता करण्यास वि.प.ने विलंब लावल्याने, सदर तक्रारीच्या न्याय निर्णयास विलंब होत आहे. मंचाने वि.प.स आपले म्हणणे व कागदपत्रे सादर करण्यास संधी दिली मात्र वेळोवेळी कळवूनही वि.प.कडून योग्य तो प्रतिसाद मिळत नाही असे खेदाने नमूद करावे लागत आहे. याची दखल वि.प.च्या बिलींग विभाग प्रमुखांनी घेणे आवश्यक आहे. ग्राहकाची तक्रार, त्या अनुषंगाने सुनावणी दरम्यानची कथने, वि.प.चे म्हणणे व कार्यवाही यावरुन निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे मीटर वाचनाप्रमाणे बीले देण्यास झालेल्या विलंबाबद्दल भरपाई देणे उचित आहे काय ?

उत्तर : होय

२) त्या संबंधीच इतर मार्गदर्शन व सूचना वि.प.स देणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

३) आदेश ?

उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

ग्राहकाने आपल्या शेतातील कृषि वापरासाठी वितरण कंपनीकडून दि. २२.६.१९९५ रोजी ५ अश्वशक्ती इतक्या भाराची जोडणी क्र. २७००८०२७३३५ मंजूर करुन घेतली आहे. त्यावेळेपासून अश्वशक्तीवर आधारित बीले वि.प.कडून दिली जात होती. मात्र त्यानंतर ग्राहकाने अर्ज करुन आपणांस मीटर वाचनाप्रमाणे व वापराप्रमाणे बीले मिळावीत अशी मागणी वि.प.कडे केली. त्यास अनुसरुन वि.प.ने मीटर बसविला. मीटर नेमका कोणत्या तारखेस बसविला या संबंधी वि.प. व ग्राहक यांच्यात वाद आहे. ग्राहकाचे म्हणणे दि. २१.६.२००८ रोजी मीटर बसविला. मात्र वि.प.च्या म्हणण्यानुसार दि. २०.१०.२००८ रोजी मीटर बसविला आहे.

This document was created using Smart PDF creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFcreator.com

दोघांच्या म्हणण्यातील सत्यता पडताळून पहातां, ग्राहकाने त्यासंबंधी पूर्वीच्या तक्रारीत अथवा आताही दि. २१.६.२००८ रोजीच मीटर बसविला या संबंधी कोणताही ठोस पुरावा मंचासमोर दाखल केलेला नाही. या उलट, वि.प.ने आपल्या कागदपत्रात जत उप विभागाकडून कनिष्ठ अभियंता यांना दिलेल्या मिटरचा गेट पास क्र. ६८२ दि. ११.१२.२००८ पुराव्यासाठी जोडला आहे. सदरील गेट पास मधील मीटर क्र. ३९४४०३ ग्राहकाकडे आजमितिस चालू आहे. त्यामुळे वि.प.ने म्हटल्याप्रमाणे २०.१२.२००८ हीच मीटर बसविल्याची तारीख निश्चित करुन मीटर वाचनाप्रमाणे पाहिले बील ग्राहकास मंचाने आदेश दिल्यानंतर दिलेले आहे. कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांनी पत्र क्र. २२९ दि. ७.१.२०१२ रोजी पत्र देऊन २७३९ रिडींगची नोंद कळविली आहे. त्यामुळे ७.१.२०१२ ही तारीख पहिले बील मिळाल्याची गृहीत धरणे योग्य होईल. मंचासमोर वि.प.ने सादर केलेले बील त्यामध्ये २७३९ मागील रिडींग व चालू रिडींग २९७४ असल्याचे नमूद करुन त्यामध्ये वापराचा कालावधी दि. २९.१२.२०११ ते २९.३.२०१२ अशी तारीख नमूद केली आहे. त्यामध्ये डिसेंबर २०११ मधील रिडींग उपलब्ध नाही असे नमूद केलेले बील वजा केले आहे. डिसेंबर २०११ मध्ये सी.पी.एल. वरील नोंद बघतां, त्यावर मीटर क्रमांक टाकला आहे, मात्र प्रत्यक्षात पुढच्या तिमाही मध्येच मिटरचे वाचन केले आहे व त्यामुळे दि. २१.१२.२००८ ते जानेवारी २०१२ हा कालावधी विलंब भरपाईसाठी मंचाने निश्चित केला आहे. विनियमातील तरतुदीनुसार परिशिष्ट ' अ ' मध्ये नोंद केल्याप्रमाणे कृषि ग्राहकाच्या मिटरच्या नोंदी दर ३ महिन्यातून घेणे कायद्याने बंधनकारक आहे. तशा नोंदी घेण्याची कृती वि.प.कडून झालेली नाही त्यामुळे भरपाई देत असतांना विलंबाच्या पहिल्या महिन्यास किंवा त्याच्या भागास रु. १००/- व त्या पुढील प्रत्येक महिन्यास रु. २००/- अशी भरपाई रकमेची विनियमात तरतूद आहे. त्यामुळे वर नोंद केलेला कालावधी याचा विचार करतां, रु. ९५००/- इतकी रक्कम ग्राहकास विलंब भरपाई म्हणून देणे योग्य आहे. बील दुरुस्ती नंतर सदर रकमेचे समायोजन सदरच्या बिलात करुन राहिलेली रक्कम पुढील बिलातून समायोजित करण्यात यावी असे मंच नमूद करीत आहे. ग्राहकाची रोखीने रक्कम देण्याची मागणी नामंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे पहिल्या मुद्दयाचे उत्तर ' होय ' असे नमूद केले आहे. विभागीय कार्यालय कवठे महांकाळ सांगली मंडलाच्या अंतर्गत येत असल्याने सदर विभागातील बिलाबाबत तक्रारी वारंवार मंचाकडे येत असतात. त्या संबंधी अंतर्गत कक्ष स्तरावर निर्णय होणे योग्य व ग्राहकाच्या दृष्टीने सुलभ होईल. तसे न झाल्यामुळे ग्राहकाने मंचाकडे दाद मागितली आहे. सदरचे बील देत असतांना मीटर बसविला पण त्याची नोंद बिलींग विभागास योग्य त्या पध्दतीने व योग्यवेळी झालेली नाही, त्यामुळे अश्वशक्तीवर आधारित बीले ग्राहकास दिली गेली आहेत. त्या सगळ्याचा परामर्श सदर बील दुरुस्त करुन देत असतां वि.प.स करावा लागणार आहे. दि. २०.१२.२००८ पासून सप्टेंबर २०११ पर्यंत अश्वशक्तीवर आधारित बील दिलेले आहे. त्यानंतर मीटर रिडींगप्रमाणे डिसेंबर २०११ चे बील दिले आहे, तथापि त्यात ' रिडींग उपलब्ध नाही ' असा शेरा असल्याने ' फिक्स्ड चार्ज ' लावून सरासरी बील दिले आहे. ह्या सर्व बाबी बील दुरुस्त करुन देतांना बघणे आवश्यक होते व आहे. तशा प्रकारे बील दुरुस्त केलेला कोणताही अहवाल, मंचाने यापूर्वी दि. २५.१.२०१२ रोजी आदेश परीत करुनही, वि.प.ने मंचासमोर दाखल केलेला नाही, हीही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.smartpdfcreator.com

त्यामुळे मार्च २०१२ चे बील जे सी.पी.एल. वर नोंद आहे, त्यामध्येही दुरुस्ती करुन ग्राहकाची मागणी नसूनही योग्य त्या पध्दतीने बील दिले गेले नसल्यामुळे दंड, व्याज या रकमा वजावट करुन ग्राहकास बील द्यावे व त्यास सर्व तपशील वरील भरपाई रकमेसह समजून सांगावा. त्याचप्रमाणे मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे ' फोका ' रकमेची वजावट याचाही विचार करावा. या सर्व बाबी लेखी स्वरुपात करुन तसे मंचास कळवावे असा आदेश मंच पारीत करीत आहे व त्यामुळेच दुसऱ्या मुद्दयाचे उत्तर ' होय ' असे लिहीलेले आहे. सदरील प्रकरणी ग्राहकाने मीटर बसविण्यापूर्वी दि. १४.११.२००८ रोजी रु. १९२०/- इतकी रक्कम वि.प.कडे जमा केली आहे, त्यानंतर केवळ मीटर प्रमाणे बील दिले नाही म्हणून बिलाची रक्कम जमा केली नाही, हीही बाब चुकीची आहे. या सर्व बाबतीत वि.प.ने आपले दफ्तर व त्यासंबंधीची कागदपत्रे योग्य पध्दतीने न हाताळल्यानेच चुकीच्या नोंदी होऊन ग्राहकाच्या नांवे येणे बाकी निघत आहे. त्याचप्रमाणे योग्य त्या वेळी वि.प.चा महसुलही जमा झालेला नाही, त्यामुळे तत्कालीन संबंधितांवर योग्य ती कारवाई होणे मंचास अपेक्षित आहे. सबब मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) तपशिलात उल्लेख केल्याप्रमाणे रु. ९५००/- इतकी भरपाई ग्राहकास वि.प.ने द्यावी. तसेच दि. २०.१२.२००८ पासून पूर्णपणे नव्याने बील तयार करुन देऊन त्यामध्ये तपशिलात नमूद केल्याप्रमाणे सर्व बाबी नमूद करुन ग्राहकास बील अदा करावे.

२) सदर भरपाई रक्कम वर दिलेल्या बिलात समायोजन करावी व उर्वरित रक्कम पुढील बिलातून समायोजित करण्यात यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे- पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com